# वीज ग्राहकांना आवाहन

## पावसाळयात घ्यावयाची काळजी

मुंबईत पावसाळयामध्ये विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे तसेच वीजेचा झटका बसून अपघात होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सदर समस्यांचा सामना करण्यासाठी बेस्ट उपक्रम फक्त प्रतिबंधनात्मक उपाययोजनाच करत नाही तर आपल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जागोजागी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक करते. पावसाळयामध्ये अनेक ठिकाणी पाणी साठणे व वाहतुकीची कोंडी होणे यामुळे खंडित विद्युत पुरवठा पूर्वपदावर आणण्यासाठी बराच विलंब होतो.

बेस्ट उपक्रमाने ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी रांत्रदिवस तसेच सुट्टीच्या दिवशी व रविवारी कार्यरत असणारे "कॉल सेंटर" प्रस्थापित/कार्यरत केले आहे. ज्यांचा दुरध्वनी क्रमांक. २२८४३९३९ आहे. उपक्रमाकडे १०.१० लाख वीजग्राहकांची संगणीकृत माहिती उपलब्ध असलेले तसेच दक्षिण मुंबईतील कुलाब्यापासून सायन, माहिम पर्यंतचे वीजग्राहक यांची पूर्ण माहिती असलेले हे कॉल सेंटर ८ वितळतार (Fuse Control) केंद्रे ४ बिघाड दुरूस्ती (Fault Control) केंद्रे तसेच ३ प्रणाली(व्दीप्रणाली)/देखरेख यंत्रणेस जोडले गेले आहे. सदर कॉल सेंटरवर तक्रार नोंदवताना वीजग्राहकांना फक्त त्यांचा वीजग्राहक क्रमांक अथवा वीजमापक(Meter) क्रमांक नोंदवावा लागेल. वीजग्राहक क्रमांक हा नऊ आकडी उदाहरणार्थ १२३-५५८-०१९ असा असून विद्युत देयकाच्या अगदी वरील बाजूस उजवीकडे छापलेला आहे. तसेच, वीजमापक क्रमांक हा विद्युत देयकाच्या प्रथमदर्शनी बाजूस परंतु डावीकडे व वीजग्राहकाचे नाव, पत्त्याच्या खाली आहे. दोन पैकी एक क्रमांक तक्रार नोंदविताना आपल्या जवळ बाळगावा. जेणे करून तक्रारीचे निवारण जलदगतीने करणे सुलभ होईल.

वीजग्राहक विद्युत पुरवठा खंडित होणे व इतर तक्रारींसाठी (उदा.आग लागणे, वीजेचा झटका बसणे, ठिंगण्या उडणे इ.) या साठी दुरध्वनी क्रमांक २२८४ ३९३९ किंवा खाली दिलेले दुरध्वनी क्रमांक पर्याय म्हणून दिले आहेत, ग्राहक ते वापरू शकतात.

| उत्तर विभाग | | दक्षिण विभाग | |
|---|---|---|---|
| दादर | २४१२ ४२४२ | कुलाबा | २२१८ ४२४२ |
| माहिम | २४४४ ४२४२ | पाठकवाडी | २२०८ ४२४२ |
| वरळी | २४९५ ४२४२ | ताडदेव | २३०९ ४२४२ |
| सुपारीबाग | २४११ ४२४२ | मस्जिद | २३४७ ४२४२ |

## दोष नियंत्रण केंद्र (२४ तास उपलब्ध)

एकाच इमारतीतील बऱ्याच सदनिकांचा किंवा लगतच्या इमारती किंवा त्याहीपेक्षा मोठया क्षेत्रातील खंडीत वीज पुरवठा/ठिणग्या पडणे/विजेचा धक्का लागणे याकरिता खालील दोष नियंत्रण केंद्रात तक्रार करा.

| | | | |
|---|---|---|---|
| दादर | २४१४६६११/२४१४६६८३<br>२४१२८६८३<br>२४१४६२६२ विस्ता.५३२ | पाठकवाडी | २२०६६६११/२२०६६६६१<br>२२०१०५७८ विस्ता.७४८ |
| माहिम | २४४५६६११<br>२४४५१०६० | प्रभादेवी | २४३०६६११<br>२४३२७००७ |

वीजेचा धक्का बसू नये अथवा इतर अपघात घडू नयेत या साठी बेस्ट उपक्रमाने खाली दिल्याप्रमाणे "काय करावे" व "काय करू नये" या संबधी मार्गदर्शक सुचनांचे पालन करून उपक्रमास बहुमोल सहकार्य करावे अशी विनंती.

वितळतार नियंत्रण कक्ष, दोष नियंत्रण कक्षाची ठिकाणे आणि सर्व प्रवर्तन आणि परिरक्षण विभागाचा सीमा दाखविणारा नकाशा वर दर्शविलेला आहे

## वीजग्राहकांनो हे करा

**१. वीजमापकांचा पावसाच्या पाण्यापासून बचाव करण्याकरता वीजमापक केबीन सिमेंटने बांधून घ्या तसेच केबीन जमिनीपासून उंचावर बांधा. लाकडी केबीन योग्य प्रकारे सुरक्षित करा.**

**२. परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडून आपल्या वीजमापकांच्या केबीनपासून घरापर्यंतचे तारखंड तसेच घरातील विद्युत उपकरणांचे तारखंड तपासून घ्या.**

**३. अतिवृष्टीच्यावेळी किंवा वीजमापक केबिनमध्ये पाणी गळू लागल्यास किंवा पाणी शिरले असता आपल्या घरातील वीजेचे मुख्य स्वीच बंद करा. त्रुटी पुर्णपणे दुर झाल्यानंतरच वीजेचे स्वीच सुरू करा.**

**४. वीजमापकांची केबिन,मार्गप्रकाश दिव्यांचे खांब,डिस्ट्रीब्युशन पिलर्स या मधुन ठिणग्या पडत असतील किंवा त्या व्दारे वीजेचा धक्का लागत असेल तर संबंधित फ्युज नियंत्रण कक्षाशी तात्काळ संपर्क साधा.**

## हे करु नका

**१. वीजमापकांच्या केबीनमध्ये पाणी गळत असल्यास हातमोजे,रबरी बुट,लाकडी अथवा इन्सुलेटड प्लॅटफार्मचा वापर केल्याशिवाय संचमाडणीस स्पर्श करू नका.**

**२. कोणत्याही परिस्थितीत विद्युत ठिणगी पडत असेल तसेच पाणी ठिबकत/गळत असेल,मार्ग प्रकाश स्तंभांना ,रस्त्यावर असणाऱ्या लाल रंगाच्या डिस्ट्रीब्युशन पिर्लस व केबिनमधील वीजमापकांना स्पर्श करू नका.**

**३. विशेषत: ज्या सदनिकांना/घरांना अथवा इमारतींना तात्पुरता पुरवठा देण्यात आला आहे. त्यांनी फक्त अत्यावश्यक उपकरणांचा वापर करावा.**

पावसाळयात वीजग्राहकांना सर्वतोपरी मदत मिळावी या करता बेस्ट उपक्रमने आवश्यक ती तयारी केली आहे. वीजग्राहकांनी आपली तक्रार काय आहे हे कळविल्यास ती दूर करण्याचे सर्व प्रयत्न बेस्टतर्फे केले जातील. प्रसंगी खबरदारीचे उपाय म्हणुन बेस्टला वीज पुरवठा बंद करावा लागतो. या काळात येणाऱ्या तक्रारींचे प्रमाण आणि त्यांचे स्वरूप तसेच पाणी तुंबल्यामुळे जमिनीखालील तारखंड बिघाड शोधण्यास होणारा विलंब आणि कर्मचाऱ्यास कामावर हजर राहण्यास येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन वीजग्राहकांनी अशा आणिबाणीच्या काळात कर्मचारी वर्गाला सहकार्य करावे, असे आवाहन बेस्टतर्फे करण्यात येत आहे.

---------